# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः 09.06.2023** **वारः शुक्रवार**

---

1. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या सर्बिया दौऱ्याचा आज शेवटचा दिवस,
2. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी साधला सौदी अरेबियाच्या राजपुत्रांशी संवाद,
3. आगामी ऑलिम्पिक स्पर्धेसाठी केंद्राने 450 कोटी रुपये खर्च केल्याची केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांची माहिती
4. आशियाई महिला कनिष्ठ हॉकी स्पर्धेत भारत उपांत्य फेरीत दाखल आणि
5. अरबी समुद्रात निर्माण झालेलं बिपरजॉय हे चक्रीवादळ उत्तरेकडे सरकलं

**द्रौपदी मुर्मू**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या सर्बिया दौऱ्याची आज सांगता होणार आहे. त्यांनी काल सर्बियाची राजधानी बेलग्रेड इथं त्यांचे सर्बियाचे समपदस्थ अलेक्झांडर वुचिच यांच्याशी द्विपक्षीय व्यापारावर चर्चा केली. दोन्ही देशांदरम्यानचा व्यापार या दशक अखेरपर्यंत सध्याच्या 320 मिलियन युरोजवरून एक बिलियन युरोवर नेण्यास दोन्ही नेत्यांनी मान्यता दिली. द्रौपदी मुर्मू सध्या तीन दिवसांच्या सर्बियाच्या दौऱ्यावर आहेत. त्यापूर्वी झालेल्या प्रतिनिधीमंडळ स्तरीय चर्चेदरम्यान दोन्ही देशांनी विविध क्षेत्रात सहकार्य करण्यासही मंजुरी दिली. सर्बियाचे राष्ट्राध्यक्ष अलेक्झांडर वुचिच यांनी भारतीयांना व्हिजा देण्याच्या प्रक्रियेचं सुलभीकरण करण्याचं वचन दिलं. भारत-सर्बियादरम्यानची थेट विमानसेवा लवकरच सुरू होईल आणि यामुळे पर्यटन आणि व्यवसायाला चालना मिळेल, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली.

**सौदी अरेबिया**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल सौदी अरेबियाचे राजपुत्र मोहम्मद बिन सलमान बिन अब्दुलअझीझ अल सौद यांच्याशी फोनवरून संवाद साधला. द्विपक्षीय सहकार्य आणि परस्पर हिताच्या विविध बहुपक्षीय आणि जागतिक मुद्द्यांवर या दोन्ही नेत्यांनी चर्चा केली. संघर्षग्रस्त सुदानमधून भारतीयांना सुरक्षितरित्या बाहेर काढण्यासाठी सौदी अरेबियानं केलेल्या सहकार्याबद्दल मोदी यांनी मोहम्मद बिन सलमान यांचे आभार मानले, तसंच हज यात्रेसाठी शुभेच्छा दिल्या. भारताच्या जी-20 अध्यक्षतेच्या काळात भारतानं हाती घेतलेल्या विविध उपक्रमांना मोहम्मद बिन सलमान यांनी पूर्ण पाठिंबा दर्शवला, तसंच त्यांच्या आगामी भारतभेटीबद्दल उत्सुक असल्याचंही नमूद केलं.

**इस्त्रो**

चांद्रयान 3 मोहीम जुलै महिन्याच्या मध्यापर्यंत उड्डाणासाठी सज्ज होईल, अशी माहिती इस्त्रो अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे अध्यक्ष एस. सोमनाथ यांनी काल दिली. चंद्राच्या पृष्ठभागावर रोव्हर पोचवण्याचा या मोहिमेचा उद्देश आहे. बंगळुरू इथं आयोजित करण्यात आलेल्या एका आंतरराष्ट्रीय परिषदेच्या पार्श्वभूमीवर ते पत्रकारांशी बोलत होते. चांद्रयान 3 मोहिमेसाठीच्या ऑर्बिटर, लँडर, रोव्हर आणि प्रोपल्शन मॉड्यूलच्या चाचण्या सध्या सुरू आहेत आणि त्यांच्या सहाय्याने एलव्हीएम 3 लाँच वेहिकल तयार केलं जाईल. एलव्हीएम रॉकेट या महिन्याच्या शेवटपर्यंत सज्ज होईल आणि जुलैच्या सुरुवातीपर्यंत चांद्रयान 3 रॉकेटशी जोडलं जाईल, असं त्यांनी सांगितलं. यातलं लँडर चंद्राच्या पृष्ठभागावर विशिष्ट ठिकाणी उतरेल आणि रोव्हर इच्छित स्थळी पोचवेल, ज्याच्या सहाय्याने चंद्राच्या पृष्ठभागाच्या रासायनिक घडणीचा अभ्यास केला जाईल, असं सोमनाथ यांनी नमूद केलं. आदित्य एल एक आणि गगनयान मोहिमांच्या प्रगतीची माहितीही त्यांनी दिली.

**मणिपूर**

मणिपूरमध्ये गेल्या 48 तासांत कोणत्याही हिंसक घटनेची नोंद झालेली नाही आणि राज्यातली परिस्थिती सध्या शांत आणि नियंत्रणाखाली आहे. राज्यातल्या 5 जिल्ह्यांमध्ये 12 तासांसाठी, तर आजूबाजूच्या डोंगराळ जिल्ह्यांमध्ये 10 तासांसाठी संचारबंदीचे नियम शिथिल करण्यात आले असल्याची माहिती मणिपूर सरकारचे सुरक्षा सल्लागार कुलदीप सिंह यांनी जारी केलेल्या निवेदनात दिली आहे. इतर 6 जिल्ह्यांमध्ये संचारबंदी लागू नाही. गेल्या 24 तासांत पूर्व इम्फाळ जिल्ह्यातल्या पोरोमपत पोलिस स्थानकाच्या हद्दीतून 27 शस्त्रं, 245 दारूगोळा आणि 41 बॉम्ब जप्त करण्यात आले, तर बिश्नूपूर जिल्ह्यात एक शस्त्र आणि 2 बॉम्ब ताब्यात घेण्यात आले. आत्तापर्यंत राज्यभरातून एकंदर 896 शस्त्रं, 11 हजारापेक्षा जास्त दारूगोळा आणि दोनशे विविध प्रकारचे बॉम्ब जप्त करण्यात आले आहेत. मणिपूरमधल्या हिंसाचारामुळे विस्थापित झालेल्या नागरिकांच्या मदतीसाठी गृहमंत्रालयानं 101 कोटी रुपयांचा मदतनिधी जाहीर केला आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी राज्याच्या विविध संवेदनशील भागांना भेटी दिल्या आहेत. तसंच राज्य आणि केंद्रीय दलांच्या संयुक्त तुकड्या राज्याच्या अनेक भागांमध्ये शोधमोहिमा राबवत असल्याची माहितीही या निवेदनात देण्यात आली आहे.

**जयशंकर कॅनडा**

माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हत्येचा आनंद साजरा करण्यावरून परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी कॅनडावर टीका केली. फुटीरतावादी, कट्टरतावादी आणि हिंसेला प्रोत्साहन देणाऱ्यांना कॅनडा आश्रय देत आहे आणि ही बाब भारत-कॅनडा संबंधांसाठी योग्य नाही, असा इशारा त्यांनी काल नवी दिल्लीत पत्रकारांशी बोलताना दिला. यामागे मतांचं राजकारण सोडता काय कारण असू शकतं, हे आपल्याला कळत नसल्याचंही ते म्हणाले. कॅनडामध्ये शिक्षण घेत असलेल्या 700 विद्यार्थ्यांना कॅनडामधून परत पाठवलं जाण्याबद्दल विचारलं असता, सद्भावनेनं अभ्यास करत असलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षा देणं ही कॅनडाची चूक असल्याचंही जयशंकर यांनी नमूद केलं. परराष्ट्र मंत्रालय आणि भारतीय उच्चायुक्तालयानं या

प्रकरणात लक्ष घातलं आहे. जर या भारतीय विद्यार्थ्यांनी काही चूक केलेली नसेल, तर त्यांच्या समस्येवर उपाय शोधण्यासाठी कॅनडा सरकारवर दबाव आणण्याचा प्रयत्न भारत सरकार करेल, अशी माहिती त्यांनी दिली.

**ठाकूर-ऑलिम्पिक**

आगामी ऑलिम्पिक स्पर्धेसाठी केंद्र सरकारने आतापर्यंत 450 कोटी रुपये खर्च केले असल्याची माहिती केंद्रीय क्रीडा मंत्री अनुराग ठाकूर यांनी दिली आहे. ते काल नवी दिल्लीत एका कार्यक्रमादरम्यान बोलत होते. खेळाडूंचं प्रशिक्षण, विविध क्रीडा उपकरण आणि अन्य सुविधा यांवर हा निधी खर्च करण्यात आला आहे. खेळाडूंना प्रोत्साहन म्हणून आवश्यकता वाटल्यास अधिक निधीची तरतूद करण्यात येईल, जेणेकरून 2024 पर्यंतच्या  परीस ऑलिम्पिक स्पर्धेत जास्त पदकांची कमाई करता येईल. आशियाई स्पर्धांच्या तयारीसाठी आतापर्यंत दोनशे वीस कोटी रुपयांहून अधिक निधी खर्च करण्यात आला असून, या वर्षी चीन मध्ये होणाऱ्या आशियाई स्पर्धेत भारतीय खेळाडू उत्तम कामगिरी करतील असा विश्वास त्यांनी याप्रसंगी व्यक्त केला.

**महिला हॉकी**

आशियाई महिला कनिष्ठ हॉकी स्पर्धेत, जपानमधील काकामिगाहारा इथं काल झालेल्या सामन्यात भारतीय महिला संघान, अ गटातील शेवटच्या सामन्यात, चीन तैपेई संघाला 11-0 अशा फरकाने हरवत उपांत्य फेरीत प्रवेश केला. उद्या होणाऱ्या उपांत्य  सामन्यात भारताचा सामना जपान किंवा कझाकस्तान पैकी विजेत्या संघाशी होईल.

**क्रिकेट**

इंग्लंडमध्ये ओव्हल मैदानावर सुरु असलेल्या, विश्वचषक कसोटी क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात, काल दुसऱ्या दिवसअखेर भारताच्या पहिल्या डावात 5 बाद 151 धावा झाल्या. सध्या के. एस. भरत 5 आणि अजिंक्य राहणे 29 धावांवर खेळत आहेत. ऑस्ट्रेलिया संघाने पहिल्या डावात 469 धावा केल्या आहेत आणि भारत अद्याप 318 धावांनी पिछाडीवर आहे. भारताच्या पहिल्या डावाची सुरुवात डळमळीत झाली. रोहित शर्मा, शुभमन गिल, चेतेश्वर पुजारा, विराट कोहली आणि रवींद्र जडेजा या भारतीय संघाच्या बिनीच्या फलंदाजांना फारशी चांगली कामगिरी करता आली नाही.

फ्रेंचओपन

फ्रेंच खुल्या टेनिस अजिंक्यपद स्पर्धेच्या उपांत्य फेरीत महिला एकेरीत काल अग्रमानांकित इगा श्वायतेकनं बियाट्रिझ हदद माया हिचा 6-2, 7-6 असा थेट सेट्समध्ये पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला. तत्पूर्वी, थरारक लढतीत कॅरोलीना मुकोव्हानं दुसऱ्या मानांकित ॲरीना साबालेकांवर 7-6, 6-7, 7-5 अशी मात केली. आता अंतिम सामना श्वायतेक आणि मुकोव्हा या दोघींमध्ये रंगणार आहे. मिश्र दुहेरीत मियू कातो आणि टिम पुत्झ यांनी बियांका अँड्रेस्कू आणि मायकल व्हीनस या जोडीवर 4-6, 6-4, 10-6 असा विजय

मिळवत अजिंक्यपद पटकावलं. पुरुष एकेरीत उपांत्य फेरीच्या सामन्यांमध्ये आज अग्रमानांकित कार्लोस अल्काराजसमोर तिसऱ्या मानांकित नोव्हाक जोकोविचचं आव्हान असेल, तर कॅस्पर रूडला अलेक्झांडर झ्वेरेव्हचा सामना करावा लागेल.

**हवामान**

नैऋत्य मान्सून काल केरळमध्ये दाखल झाला. दरवर्षी साधारणपणे 1 जूनला केरळमध्ये दाखल होणाऱ्या मान्सूननं यंदा 7 दिवस उशिरानं केरळमध्ये प्रवेश केला. पुढच्या 48 तासात केरळचा उर्वरित भाग, तामिळनाडू आणि कर्नाटकच्या काही भागात मान्सूनची आगेकूच होण्यासाठी परिस्थिती अनुकूल आहे, असं हवामान विभागानं म्हटलं आहे.

**बिपरजॉय**

दरम्यान मध्य पूर्व अरबी समुद्रात निर्माण झालेलं अति तीव्र चक्रीवादळ बिपरजॉय, गेल्या सहा तासांत वेगाने उत्तर दिशेकडे सरकत आहे. सद्यस्थितीला हे चाक्रीवादळ गोव्यापासून 840 किलोमीटर, मुंबईपासून नैऋत्य दिशेला 870 किलोमीटरवर तर गुजरातमधील पोरबंदर पासून 870 किलोमीटरवर आहे; या पार्श्वभूमीवर गुजरातच्या किनारपट्टीच्या भागात सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे. चक्रीवादळाच्या प्रभावामुळे 13 जूनपर्यंत पाऊस तसंच वादळी वारे वाहण्याची शक्यता आहे. त्यामुळे 12 ते 14 जूनपर्यंत, मच्छिमारांनी अरबी समुद्रात मासेमारीला न जाण्याचा इशारा हवामान विभागाने जारी केला आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.
# नमस्कार.